सकाळ भंडारा
मंगळवार, २२ ऑगस्ट २०२३
SakalNews
@SakalMediaNews
www.esakal.com
TODAY



फळबाग लागवड करून शेतकऱ्यांनी उन्नती साधावी
३

# सायबर सुरक्षा जागरूकता कार्यशाळा

**भंडारा, ता. २१ :** क्विक हील फाऊंडेशन, पुणे आणि सायबर सेल, महाराष्ट्र पोलिस, भंडारा यांच्या वतीने शुक्रवारी जे. एम. पटेल महाविद्यालयात सायबर सुरक्षा जागरूकता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात एसडीपीओ डॉ. अशोक बागुल यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी विद्यार्थ्यांना सायबर विश्वात कसे वागावे याबाबत मार्गदर्शन केले. सायबर पोलिस कसे काम करतात तसेच सायबर गुन्ह्यांचा तपास कसा केल्या जातो याबाबत विस्तृत माहिती दिली. डॉ. बागुल यांनी विविध प्रकारच्या सायबर गुन्ह्यांबाबत माहिती दिली आणि या सायबर गुन्ह्यांपासून स्वतःला कसे सुरक्षित ठेवता येईल यबद्दल मार्गदर्शन केले.



**भंडारा : कार्यशाळेत बोलताना प्राचार्य विकास ढोमणे.**

कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.विकास ढोमणे यांनी विद्यार्थ्यांना आजच्या डिजिटल युगात सायबर सुरक्षेचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी इंटरनेट, मोबाइल आणि इतर उपकरणांचा नैतिकतेने आणि विवेकबुद्धीने कसा वापर करावा आणि आपले जीवन सुरक्षित करण्यासाठी नियमांचे पालन करावे असे आवाहन केले.प्रास्ताविकात क्विक हील फाऊंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सुगंधा दाणी यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व, सामान्य लोकांमध्ये सायबर जागरूकता याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गेल्या वर्षी जे. एम. पटेल कॉलेजच्या सायबर वॉरियर्स यांनी १० हजारांहून अधिक शालेय विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा जागरुकता केली होती. या उल्लेखनीय कार्यासाठी पटेल कॉलेजला विशेष पुरस्काराने सन्मानित केले. पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना सायबर विश्वात सुरक्षित कसे राहायचे याबाबत मार्गदर्शन केले. कोणत्याही सायबर गुन्ह्याबद्दल आपण गोल्डन अवरमध्ये सावध होऊन आपली तक्रार नोंदवावी याची माहिती दिली. २४ तासांच्या आत तक्रार केल्यास सायबर गुन्ह्यांमुळे होणारे नुकसान कमी होण्यास मदत होऊ शकते असे यांनी सांगितले. संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रवीण घोसेकर यांनी आभार मानले. क्विकहील फाऊंडेशनचे विदर्भ समन्वयक नागेश तलारी, धनंजय जाचक तसेच सायबर सेलचे दिनेंद्र आंबेडारे आणि गौतम राऊत हे उपस्थित होते. कार्यशाळेच्या आयोजनासाठी डॉ. कार्तिक पणिकर, डॉ. श्रीधर शर्मा, डॉ. सबाह नसीम, प्रियांका शर्मा, पलाश फेंडेवार, डॉ. विनी ढोमणे, डॉ. श्याम डफरे, लावण्या माने, विद्यार्थी समन्वयक व विद्यार्थी उपस्थित होते.